परिपत्रक

कामगार कल्याण अधिकारी
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – 411 018
कमांक – काक/3/कावि/५३/2012
दिनांक – १७ जानेवारी 2013

**विषय :– ठेकेदारी पध्दतीने देण्यात येणा–या कामाबाबत...**

2/– पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध विभागामार्फत ठेकेदारी पध्दतीने कामगार नेमले जातात. अथवा विविध प्रकारची कामे ठेकेदारी पध्दतीने केली जातात. ठेकेदारी पध्दतीने नेमलेल्या कामगारांना व ठेकेदारी पध्दतीने दिलेल्या कामावरील कामगारांना विविध कामगार कायदे लागू होतात. या कायदयांची प्रभावी अंमलबजावणी करण्याची जबाबदारी ज्या विभागाने ठेका दिलेला आहे त्या विभागाची आहे. तथापि असे निदर्शनास आले आहे की, कामगार कायदयांची प्रभावी अंमलबजावणी होत नाही. सबब आपल्या विभागाकडून ठेकेदारी पध्दतीने कामगारांची नेमणुक केली असल्यास त्या कामांचे आदेश, ठेकेदाराशी केलेल्या कराराची प्रत तसेच ठेकेदारी पध्दतीने दिलेल्या सर्व कामांच्या आदेशाच्या प्रती (**Work order**) कामगार कल्याण विभागाकडे पाठविण्यात याव्यात. त्याचप्रमाणे काही कायदेशिर मार्गदर्शन/सल्ला याची गरज असल्यास कामगार कल्याण विभागाशी संपर्क साधावा. कामगार कायदयांची अंमलबजावणी होत असल्याबाबतची खबरदारी घेण्याची जबाबदारी विभाग प्रमुखांची आहे याची नोंद घ्यावी.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – 41 018

प्रति,
सर्व विभाग प्रमुख...

---

ksparipatrakethekdari02